# Bachelor of Arts (B.A.) Final Examination
## MARATHI (New)
## (Other Language)

वेळ: तीन तास] [एकूण गुण : 100

1. 'वीव्हावो स्वीकारू' या लीळेतून श्री गोविंद प्रभूंच्या वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन कसे घडते ते स्पष्ट करा.

**किंवा**

'आपुलाची वाद आपणांसी' या पाठातील लेखकाचा संघर्ष रेखाटा. 10

2. पांडूरंगाच्या मूर्तीचे वर्णन शाहीर प्रभाकर यांनी कसे केले आहे ?

**किंवा**

'ही निळी पांढरी' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 10

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **शंभर** शब्दांत लिहा :—

**गट 'अ'**

(क) भारतीय समाजव्यवस्थेचे दोषदिग्दर्शन आगरकरांनी कसे केले आहे.

(ख) 'पक्ष्यांचे घरटे हे जीवनावरील आत्यंतिक प्रेमाचे प्रतीक आहे' असे लेखक का म्हणतात ?

(ग) 'जाउनियां तीर्था काय तुवां केले' या अभंगाचा भावार्थ उलगडून दाखवा.

(घ) 'एका दु:खाची ज्योत काळीभोर असते' असे शरच्चंद्र मुक्तिबोध का म्हणतात ?

**किंवा**

**गट 'आ'**

(च) 'सृष्टीपासून दानाचा धडा घ्या' असे विनोबा भावे का म्हणतात ?

(छ) चाळीतील किडलेल्या माणसांचे दर्शन लेखक कसे घडवतात ते सोदाहरण स्पष्ट करा.

(ज) 'प्रेम' या नामदेव ढसाळांच्या कवितेचा आशय थोडक्यात विशद करा.

(झ) 'पाऊस' या कवितेतील कवी मनाची भावावस्था उलगडून दाखवा. 20

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **शंभर** शब्दात लिहा :—

**गट 'क'**

(त) संपादनाच्या प्रेरणा स्पष्ट करा.

(थ) संहितासंपादनात असलेले संहिता वाचनाचे महत्त्व विशद करा.

(द) टिप्पणी म्हणजे काय ?

(ध) ग्रंथवाचन करताना विचारात घ्यावयाचे घटक कोणते ?

**किंवा**

## गट 'ख'

(य) स्मरणिका संपादनाचे महत्त्व विशद करा.

(र) टिप्पणी लिहिताना कोणती काळजी घ्यावयाची असते ?

(ल) जाहीर निवेदन म्हणजे काय ? ते सांगून जाहीर निवेदनाचा नमुना तयार करा.

(व) इंटरनेटवरील संवाद माध्यमांचे स्वरूप स्पष्ट करा. 20

5. खालील **सर्व** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :—

(1) महाभारतातील मयसभेच्या जन्माची कथा विशद करा.

(2) द्रौपदीच्या मनातील गूढ व गुंतागुंतीचे क्षण लेखकाने कसे टिपले आहे ?

(3) 'प्रेम' कवितेतून व्यक्त झालेली कवीमनाची खंत स्पष्ट करा.

(4) 'एक टाहरा पाहिजे' असे कवी दशरथ मडावी का म्हणतात ? 20

6. खालील **सर्व** प्रश्नांची योग्य पर्यायी उत्तरे लिहा :—

(1) आद्य महानुभावीय चरित्रकार __________ यांना म्हटले जाते.

(अ) नागदेवाचार्य (ब) म्हाइंभट

(क) गोविंदप्रभू (ड) श्रीचक्रधर

(2) 'सुधारक' या पत्राचे संस्थापक संपादक __________ हे होत.

(अ) लोकमान्य टिळक (ब) लोकहितवादी

(क) गो. ग. आगरकर (ड) म. जोतिबा फुले

(3) भूदान चळवळीचे प्रवर्तक __________ आहेत.

(अ) महात्मा गांधी (ब) विनोबा भावे

(क) सरहद्द गांधी (ड) यापैकी कुणीही नाही

(4) 'मयसभा' या पाठाच्या लेखिका __________ आहेत.

(अ) इरावती कर्वे (ब) सरोजिनी बाबर

(क) सरोजिनी नायडू (ड) शांता शेळके

(5) 'किडलेली माणस' या कथेतून __________ या चाळीचे दर्शन घडते.

(अ) बटाट्याची चाळ (ब) खुटमुट्यांची चाळ

(क) गाडगीळांची चाळ (ड) यापैकी नाही

(6) 'जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।।' ही ओळ __________ यांची आहे.

(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत तुकाराम

(क) संत नामदेव (ड) संत एकनाथ

(7) 'पढंरीवर्णन' ही कविता __________ यांची आहे.

(अ) रामजोशी (ब) होनाजी बाळा

(क) प्रभाकर (ड) अनंतफंदी

(8) 'चाफा' या कवितेचे कवी __________ आहेत.

(अ) बी (ब) केशवसुत

(क) गोविंदाग्रज (ड) यापैकी नाही

(9) 'कळा ज्या लागल्या जीवा __________ की ईश्वरा ठाव्या !'

(अ) मला (ब) तुला

(क) कुणाला (ड) त्याला

(10) 'समाधान' या कवितेचे कवी __________ हे होत.

(अ) ना. घ. देशपांडे (ब) पु. ल. देशपांडे

(क) पु. य. देशपांडे (ड) यापैकी नाही

(11) आजच्या काळात संवाद व्यवहारासाठी __________ या माध्यमाचा वापर सर्वाधिक होतो.

(अ) संगणक (ब) पत्रव्यवहार

(क) टपाल (ड) यापैकी नाही

(12) संपादन कार्याला __________ कारणीभूत ठरली.

(अ) वाङ्‌मयीन अभिरूची (ब) लेखकांची अभिरूची

(क) प्रकाशकांची अभिरूची (ड) यापैकी नाही

(13) गौरवास्पद वाटणाऱ्या वयक्ती विषयीची आपली भावना व्यक्त करण्यासाठी __________ ग्रंथ काढला जातो.

(अ) स्मरणिका (ब) मासिक

(क) गौरवग्रंथ (ड) वार्षिकांक

(14) प्रकाशनपूर्व लिखितरूप म्हणजे __________ होय.

(अ) संपादन (ब) संहिता

(क) समीक्षा (ड) यापैकी नाही

(15) संहितेतील मजकुराचा भडकपणा वा आक्षेपार्ह मजकूर संपादकाला __________ या साठी बारकाईने तपासावा लागतो.

(अ) समतोलपणा साधण्यासाठी (ब) समाजधर्म दुखावणार नाही

(क) राष्ट्रहिताला बाधा येणार नाही (ड) वरील सर्व

(16) टिप्पणीची भाषा __________ असावी.

(अ) क्लिष्ट (ब) अलंकारिक

(क) संदिग्ध (ड) सुटसुटीत व सरळ

(17) टिप्पणी लिहिताना __________ या गोष्टी नसाव्यात.

(अ) पक्षपातीपणा (ब) वैयक्तिक स्तुती

(क) अकारण समर्थन (ड) वरील सर्व

(18) जाहीर निवेदनाची गरज __________ या गोष्टीसाठी महत्त्वाची ठरते.

(अ) निर्णयाच्या माहितीसाठी (ब) कंपनीच्या प्रतिष्ठेसाठी

(क) वरील दोन्हीं (ड) यापैकी नाही

(19) ग्रंथपरीक्षणाची पहिली पायरी म्हणजे __________ होय.

(अ) ग्रंथवाचन (ब) चिकित्सा

(क) मूल्यमापन (ड) ग्रंथपरीक्षण

(20) 'मायबोली' हे मराठीतील पहिले संकेतस्थळ __________ या वर्षी सुरू झाले.

(अ) 1965 (ब) 1996

(क) 1975 (ड) 1976 20